# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ४६–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. शामराव बाबुराव हिप्परकर ,<br>रा. सिंगन्नहळ्ळी, ता. जत, जि. सांगली<br><br>**विरूध्द** | अर्जदार |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शामराव बाबुराव हिप्परकर, रा. सिंगन्नहळ्ळी, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे आपल्या शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. २१.१२.२००९ अर्ज रोजी केला. यानंतर अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ३०.१२.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली.

कक्षाने दि. ४.१.२०१० रोजी आदेश पारित केले. तक्रारदाराने विहित मुदतीत चलन मिळावे व विलंबापोटी भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रार मंचासमोर दि. २४.२.२०१० ला दाखल केली. त्यामध्ये कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे कोटेशन मिळून विलंबापोटी नुकसान भरपाई मिळावी व वीज जोडणी मिळावी अशी विनंती केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. १५.४.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराने दि. २१.१२.२००९ ला अर्ज दाखल झाल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. २१.३.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे. तक्रारदाराकडून चाचणी अहवाल प्राप्त झाला नाही. चाचणी अहवाल दिल्यानंतर मुदतीत कनेक्शन देण्यात येईल. तक्रारदाराचे उच्चदाब ०.३६ कि.मी व लघुदाब ०.२४ कि.मी. व ६३ केव्हीएचा १ रोहित्राचे काम आहे.

प्रस्तुत तक्रारीच्या सुनावणीस तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता व संबंधित अधिकारी उपस्थित. चलन देण्यास विलंब झाला आहे परंतु तक्रारदाराने अद्याप चाचणी अहवाल दिला नाही, चलनाचे पैंसे भरले नाहीत. तक्रारदारास चाचणी अहवाल व चलनाचे पैंसे भरल्यानंतर मुदतीत कनेक्शन देण्यात येईल. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार विलंबापोटी भरपाई मिळण्यास पात्र आहे काय ?

उत्तर : होय

२) आदेश ?

उत्तर : खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंच्या कथनानुसार तक्रारदार याने वितरण कंपनीकडे शेतीपंप कनेक्शन मिळणेसाठी दि. २१.१२.२००९ ला अर्ज केला. १ महिन्याचे मुदतीत चलन दिले नाही ते २१.३.२०१० ला देण्यात आले. दि. २१.१.२०१० ते २१.३.२०१० या कालावधीतील ८ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. ८००/- भरपाई देणेस वि.प. जबाबदार आहे व तक्रारदाराचा तो हक्क आहे. वितरण कंपनीला कृती मानके विनियमातील तरतुदीची पूर्तता करण्यात अपयश आल्याने भरपाई द्यावी लागत आहे. वरील मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे आहे. तक्रारदाराची दुसरी विनंती वीज कनेक्शन मिळण्याबाबतची आहे. चलन दिल्यानंतर पैंसे भरले कि नाही हे तक्रारदाराने मंचापुढे येवून लेखी/ तोंडी सांगितले किंवा पोष्टाने कळविलेले नाही. वि.प.च्या म्हणण्यानुसार चाचणी अहवाल दिलेला नाही. चाचणी अहवाल दिल्यानंतर व चलनाचे पैंसे भरल्यानंतर नियमाप्रमाणे प्राधान्यक्रमानुसार वि.प.ने तक्रारदारास वीज कनेक्शन द्यावे.

मंचाकडे मोठ्याप्रमाणे दाखल होणारी प्रकरणे व वि.प.कडून कागदपत्रे मिळण्यास होणारा विलंब यामुळे प्रकरण दोन महिन्याचे मुदतीत निकाली काढता आले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस दि. २१.१.२०१० ते २१.३.२०१० या ८ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ८००/– भरपाई द्यावी.

३) सदर रकमेचे दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करण्यात यावे.

४) तक्रारदाराने चाचणी अहवाल दिल्यानंतर व चलनाचे पैंसे भरल्यानंतर नियमाप्रमाणे प्राधान्यक्रमा–नुसार वि.प.ने तक्रारदारास वीज कनेक्शन द्यावे.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ५.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :